RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ४, अंक ३३] गुरुवार, मार्च १५, २०१८/फाल्गुन २४, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ७६

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मार्च २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन-२०१७/प्र.क्र. ३२८/ज-१.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) च्या कलम ३३०अ द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे असा निदेश देते की, उक्त संहितेच्या कलम २२अ च्या पोट-कलम (२) खाली प्रदान करण्यात आलेले राज्य शासनाचे अधिकार हे जेथवर, केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील कोणतेही वैधानिक प्राधिकरण किंवा कोणतेही सार्वजनिक प्राधिकरण किंवा उपक्रम यांच्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा सार्वजनिक प्रकल्पासाठी, इतर कोणताही योग्य शासकीय भूखंड उपलब्ध नसेल तर, अशा सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा सार्वजनिक प्रकल्पासाठी गायरान जमिनीचे वापरातील परिवर्तन करणे, प्रदान करणे, पट्ट्याने देणे याबाबींशी निगडीत असतील तेथवर, शासनाने यासंबंधात वेळोवेळी काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींना अधीन राहून संबंधित जिल्हाधिकारी देखील त्याच्या अधिकार क्षेत्राच्या मर्यादेत वापरु शकतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सहसचिव.

कृपया अवलोकनार्थ

(अभिजीत भांडे-पाटील)
उपजिल्हाधिकारी (म.प्र.)